ISSN-2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

OPEN ACCESS Original Research Article

# जगवणारी आणि जागवणारी माधव सरकुंडे यांची कविता

प्रा. डॉ. कल्याणी शेजवळ

*अंबिकाबाइ जाधव महिला महाविद्यालय, वज्रेश्वरी ता. भिवंडी जि.ठाणे*

*सामाजिक परिवर्तनासाठी उपयोगी पडणारे प्रभावशाली साधन म्हणजे कविता. झोपलेल्यांना जागृत करण्यासाठी कवितेच्या झोतभट्टीत मन आणि जाणिवांना तापवून धारदार करण्यासाठी माधव सरकुंडे यांची लेखणी कविता स्वरूपात व्यक्त होते. दलित कवितेशी सममुल्य असणारी कविता वेगळे वास्तव आशयविश्व मांडते.१९९० नंतर आपण कविता या वाङ्मय प्रकाशाचा शोध घेतला तर आपणांस जाणवेल की माधव सरकुंडे यांच्या कथा, कादंबरी आणि कवितांनी वाङ्मय विश्वात वेगळे स्थान निर्माण केलेले आहे. मूळात आदिवासी चळवळीतले ते कार्यकर्ते असल्यामुळे समाजजाण आहे, अनुभवाची जोड आहे, त्यांची कविता या व्यवस्थेवर, संस्कृतीवर परंपरेवर, इथल्या न्यायव्यवस्थेवर समतेच्या हक्कासाठी अन्याय, अत्याचार विरोधात विचारणारी आहे.*

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial use provided the original author and source are credited.

माधव सरकुंडे यांचा 'माझा दम घोटतोय' हा सहावा कवितासंग्रह असून बऱ्याच कविता दाते कॉलेजच्या परिसरात लिहिल्या आहेत.१ जानेवारी, २०२१ साली देवयानी प्रकाशन, यवतमाळ या प्रकाशनाने प्रकाशित केलेले आहे. हा कवितासंग्रह डॉ. देवयानी सरकुंडे, अर्चना चिरंगे, मोनाल चिरंगे, अरूंधती सरकुंडे, मानसी सरकुंडे यांना अर्पण केला आहे. एकूण ८२ कवितांचा समावेश असून 'यस वुई कॅन वीन' या व्हॉट्स्टप ग्रुप वर बहुतेक या कवितासंग्रहातल्या बऱ्याच कविता टाकल्या आहेत. 'माझ्या कवितेची आत्मकथा' या कविता संग्रहाच्या मनोगतात कवीने स्वतःच्या कवितेबद्दल विचार नोंदविले. ते म्हणतात ''मी कविता लिहिणे केव्हा सुरू केले हे सांगता येणार नाही. परंतु मनाला जाणिवेचे अंकुर फुटले तेव्हापून कविता समजू लागली''१

''तथापि मी जे जीवन स्वतः जगलो, जे मी भोगले, माझ्या भोवताली मला जे जीवन दिसले, त्या जीवनातल्या 'व्यथा, वेदना' माझ्या संवेदनशील मनाने साठवून ठेवल्या. या सर्वांच्या पुढे कविता झाल्या. कथा झाल्या माझ्या लेखनाच्या मानाने माझ्याकडे विषय वस्तूची चणचण नव्हती, फक्त माझी अडचण होती भाषेची. हळुहळु मी भाषा ही दुरूस्त करत गेलो''. कोणत्याही वर्गीकाणात न मोडणारी कविता मानवी जीवनातील घटनाचे वर्णन करते, सोपानदेव चौधरी म्हणतात, आदिवासी समाज हा धरणी मातेचा पहिला गहीवर आहे. शेकडो वर्षांचा वनवास त्यांनी भोग्लेला आहे आणि आजही त्यांचा वनवास संपलेला नाही. पुढारलेल्या सुसंस्कृत आणि उच्च लोकांच्या जगापासून शेकडो योजने दूर राना वनात व डोंगर दऱ्यात त्यांचा प्रपंच करतात. पशु पातळीवरचे ते जीणे आहे ''.२

दहावी पास झाल्यानंतर कवी कविता लिहू लागले. मानवी मनातील भावना, अनुभव प्रकट करण्यासाठी त्यांना भाषा अपुरी पडू लागली. भाषा आणि भावनांमधील मला माझ्या मानातील अनुभवांचे संचित शब्दांच्या कोंदणात बसवता येत नव्हते. तेव्हाही मला वाटत होते, आत्ताही वाटते. भाषा ही भावने पेक्षा छोटी असते. भाषेला मर्यादा असते. भावना या अमर्याद असतात. तुमच्या भाषेला तुमची एखादी उत्कट भावना जशीच्या तशी प्रकट करता येईलच ह्याची खात्री नव्हती. बरेचवेळा भाषेपुढे भावना पांगळी होवून जाते. भावना जिवंत असते. भाषा मृत असते. ती अभिव्यक्तीचे साधन जरूर असते, परंतु सरतेशेवटी ती साधनच !'' (अभिव्यक्तीचे नाते स्पष्ट करताना ते म्हणतात).कविला अनुभव व्यक्त करण्यासाठी भाषा तोकडी वाटते.

माधव सरकुंडे यांची कविता ज्या जाणिवेतून निर्माण झाली आहे, तिला अनुभव विश्वाची खुप मोठी जोड मिळाली आहे. त्या अनुभवजन्य परिस्थितीततून त्यांची कविता निर्माण होताना दिसते. ती दलित कवितेच्या आशय आणि अभिव्यक्तीशी प्रमाण वाटते. बुध्द, ज्योतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, एकलव्य, आदिवासी क्रांतिकारक यांच्या प्रेरणेने प्रेरित झालेली आहेत. या प्रेरणास्थाना बरोबरच ज्या काळात कवितेचे बीज त्यांच्या मनात अंकुरू लागले, त्या काळातील घटना, प्रसंगांनी देखील कवितेच्या आशय विश्वाला एक आयाम प्राप्त करून दिला. त्यामुळे त्यांच्या कवितेचे जग जागे वाटते.

या कालखंडात सफदर हाश्मीची हत्या, नेलसन मंडेलाचे तुरूंगातून सुटणे, रिडल्सचे मोर्चे, मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा लढा, मेळघाटातील कुपोषणग्रस्त बालकांचे मृत्यु, इंदिरा बांधींची हत्या, स्कायलॅबचा अयशस्वी प्रयोग, मंडल कमीशनचे आंदोलन, गॅट करार, सेझ विरोधातील आंदोलन, किल्लारी भूकंप, अन्याय, अत्याचार, आरक्षण मोर्चे निर्देशन, सभा सम्मलने आणि साहित्य, साहित्येत्तर, कोरोना जग, इत्यादी घटनांतून कवीच्या कवितेचे व्यक्तीमत्व घडत गेलेले दिसून येते. अनेक घटना – प्रसंगाचे ते साक्षीदार असल्याने त्याच्या कवितेला वास्तवतेचा खुप मोठा आधार आणि पूरावा आहे. समोरचे वास्तव पाहून अस्वस्थ, संतापजनक रुप हे दृश्यात्मक कवितेचे मोठे उदाहरण म्हणता येईल.

कवीने खैरलांजी हत्याकांड घटनेचे चित्रण केले आहे. ''खैरलांजी हत्याकांड सप्टेंबर, २९, २००६ रोजी महाराष्ट्रातल्या भंडारा जिल्ह्यातील मोहाडी तालुक्यातल्या खैरलांजी गावात घडले. या दिवशी गावातल्या एका कुटुंबातल्या चार जणांची सायंकाळच्या सुमारास गावातल्या काही लोकांकडून अमानुष हत्या करण्यात आली''३ अनेक वर्षांनंतर आदिवासी माणूस बोलू लागला आहे आणि अभिव्यक्त होऊ लागला आहे. झालेल्या अन्यायातून येणारी चीड व संताप त्याच्या कवितेतून क्षणोक्षणी अभिव्यक्त होताना जाणवतो. 'जगणे माझे' या कवितेत कवी लिहितात,

''मी हमसून हंबरलो पाहून दग्ध खैरलांजी
हा विराट मोर्चा मात्र बोलला न काही,
मी एकटा आहे, ही चर्चा खोटी आहे
मासोबती आहे ही उन्हाची लाही'' (पृ. ४३)

वेदनेशी, दुखाशी नाते सांगणारी ही कविता वाचकाला विचार करायला भाग पाडते. ही कविता जशी दलित समाजातील घटका

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

OPEN ACCESS Original Research Article

प्रसंगाचे चित्रण करते. त्याचप्रमाणे शेतकरी जीवनाच्या व्यथा देखील मांडते.

"गे पंढरी, या कवितेत कवी लिहितात,

किती पिढया गेल्या

वाजवून टाळ,

तरी ना विटाळ गेला माझा. (पृ. ११६).

''पाऊस दादा या कवितेत, कवी शेतकऱ्याच्या कष्टाचे जीवन चित्रित करतात.

कर्जाच्या काळजीने काळीज होते चिंध्या,

अजून किती पिढया जगावे अशा चिंध्या'' (पृ. ४६)

कवी, कविता, कवितेचा जन्म, कवीचे विचारव्युह विचारांची भ्रमंती आणि कवितेच्या विवराविषयी कवी म्हणतात, ''कवितेच्या विश्वाच्या पसाऱ्यात फिरताना माझी भाषा बदलून जाते. शब्दाचे जूनें अर्थ पानगळी सारखे गळून पडतात व त्या जागी नवे अर्थ नव्या पालवी सारखे अंकुरीत होतो. नवं काहीतरी मिळतं. पुन्हा जन्म झाल्यासारखा वाटतो. म्हणून मी असे मानतो की, प्रत्येक कविता झाल्यावर कविचा पुनर्जन्म होतो. कवितेच्या तरलतेच्या गुंफेतून कवी बाहेर की तो पुन्हा जड विश्वाच्या व्यवहारात गुरफडतो, नव्हे, तसे त्याला करावंच लागते. कारण, त्याच्या अजैविक अस्तित्वासोबत त्याला जैविक अस्तित्वपण टिकवायचे असते. ती टिकविण्याची तो प्रयत्न करत असतो. तेव्हा त्याच्यातला कवी त्याच्या अस्तित्वाच्या कृष्णविवरात हरवलेला असतो, परत एखाद्या प्रसंगावरून किंवा घटनेवरून परत तो त्या कृष्णविवरातून कवीला शोधून काढतो. स्वतःला पुन्हा पुन्हा शोधून काढणे व ते शब्दबध्द करणे म्हणजे कविता करणे होय असे मला वाटते''.

अन्याय सहन करणाऱ्या, गुलाम बनवू पाहणाऱ्या व्यवस्थेला धक्के देणारी माणसे कायमच नकोशी वाटत असतात. सत्य आणि वास्तव भांडणाऱ्या वर्गावर पूर्वीपासून हल्ले करणारी व्यवस्था माणसावर हल्ला करून नामशेष करणारी असली तरी त्या व्यक्तीने जे विचार पेरलेले असतात ते नाश करू शकत नाही. ही घटना कविला नवी उर्जा देते. पिढयान् पिढयाचा इतिहास लिहून जाते.

"इथे माणसाचे मुल्य ठरते

त्याच्या जाती धर्मावरूनच

फाडल्या जाते राजधानीच्या भर चौकात

सत्य सांगणारे देशद्रोही ठरविल्या जातात

दाभोळकर

कलबुर्गी

गौरीलंकेश

अन पानसऱ्यांना कंठस्नान घातले जात" (पृ. १३४)

ISSN–2278-5655

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XI, Issue– IV* *July – August, 2022*

OPEN ACCESS Original Research Article

रक्तरंजित लढाया झाल्या, संविधानाचे विशोधन झाले, न्यायालयिन निवाडे झाले. पण न्याय मिळणे कठिण होत आहे, सत्य सांगणाऱ्या लोकांना देशद्रोही ठरविले जाते. हे नाकारता येणार नाही .

कुठे गेलीत या भाडाची हिरवी पाने ?
कुठे गेले पानाआडचे कोकीळ गाणे ?
कुठे गेलीत ते सुगरणीचे डेरेदार खोपे ?
कुठे गेल्यात पारग करणाऱ्या त्या बाया,
अन् त्याच्या चिमुकल्यांचे पाळणे ?
अनेक प्रश्न भराभर जमा झालेत माझ्या भोवती' (१२८)

परंतु आजदेखील या देशात शांतता, सुरक्षितता नाही. 'तुम्ही करा निश्चित' या कवितेत म्हणतात,

" अरे लक्षात ठेवा,
ज्याला दुसऱ्याचे मुक्त होणे पसंत नसते,
तो सदैव दास्यत्वाला
दिव्यत्वाचे रंग देत रहातो." (पृ.६४)

व्यवस्थेतील वास्तव मांडताना, कवि पिढयानूपिढया शहाणपणा न शिकविता गोड बोलून, वेगळया मार्गाने त्यास न्यायबुध्दीला झाकून ठेऊन व्यवस्था हाकणाऱ्या मानवी वृत्ती प्रकृतीचे कवि दर्शन घडवितो, समाज तुमचा फक्त वापर करत आहे, कारण, सूर्याला जर कॉरंटाईन केले तर काजव्याच्या प्रकाशाने तुम्हाला तुमचे आयुष्य सजविता आले पाहिजे, असा आत्मविश्वास ते पुढच्या पिढीत निर्माण करू इच्छीत आहेत.

"जॉर्ज
तुझ्या मानगुटीवर
गोऱ्या पोलिसाचा गुढगा होता
इथेतर सारी व्यवस्थाच
बसली आहे
खरेच जॉर्ज
माझा दम घोटतोय
माझाही दम घोटतोय. "

'माझा दम घोटतोय' ही कविता या समाज आणि वर्णव्यवस्थेच्या चिंधडया-चिंधडया करणारी आहे. माणूसपणाला आणि माणूसकीला काळीमा फासणाऱ्या या घटना समाजातल्या दुषित आणि कलुषित व्यवस्थेचे भेदक चित्रण करतात. जॉर्ज, दाभोळकर, कलबुर्गी, गौरीलंकेश आणि पानसरे यांना कंठस्नान घालणाऱ्या धर्म, वर्ण आणि सत्यद्वेशी समाज घटना पाहून

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–XI, Issue– IV July – August, 2022

OPEN ACCESS Original Research Article

कवीच नव्हे तर सर्व समाजाचा दम घोटतोय. 'तरीही' नावाची कविता कविता माणसाचे रितेपण आणि भरलेपण चित्रित करताना ना खंत, ना खेद अशी विशिष्ठ पटरीवर जीवन जगण्याची लागलेली सवय मानवी जीवनाच्या क्षणभंगुरतेचे चित्रण करते. तर 'बाळ' ही कविता बापलेकातील भावनिक दूरावलेपणाचे चित्रण करते. 'बाप' कवितेत कवी बापाच्या अबोल परंतु मार्मिक कष्टाच्या दखल न घेणाऱ्या मुलाबद्दल लिहितात. ही कविता समस्त बापलेकांच्या दूरावलेपणाचे चित्रण करते.

"लेकरं मोठी झाली की रद्द करतात बापाची सनद' (पृ. २९)

एवढया कवितेवर न थांबता नात्यामधला दूरावा, परकेपणा अधोरेखित करतात. विज्ञान तंत्रज्ञानाच्या जगात माणसाला प्राप्त झालेल्या बोथट भावनांचे चित्रण करताना कवी लिहितात.

"एखाद्या बेसावध क्षणी, तो कृर काळोख लुटून नेईल  
माझ्या मुठीतला वृध्द प्रकाश, मग मात्र कायमचीच रात्र असेल  
तुझ्या पप्पाच्या गावात,  
तेव्हा कुणीच नसेल गावात,  
तुझ्या फोनची वाट पाहणारा,  
मी तर नसलेचा" (पृ. ३८)

या कवितासंग्रहातील बाबा तुझ्यामुळे, भूमिका सोयरीक, दोन प्रश्न, जगातली एकमेव सुरक्षित जागा  या कविता बुदध, ज्योतिबा फुले, रमाई, माय-बाप, डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या जीवन कार्याच्या प्रेरणेतून कृतज्ञेतून निर्माण झालेल्या आहेत .या कविता आणि कवी आपल्या लेखणीतून नवे जग, नवे समाज परिवर्तन घडवू पाहतो आहे.

" ज्योतिबा !  
वेदप्रामाण्या परंपरावर,  
फुल्या मारून तु ???,  
विद्रोहाचा ज्वालामुखी,  
राबणाऱ्या माणसाचा मस्तकात अन् तिथूनच आला.  
आरंभ सम्यक बंडखोरीचा,  
आजच्या दुनियेत" (७९).

किंवा

"तुच दिलेस  
माझ्या शब्दांना  
सामर्थ्य, मग माझे सामर्थ्य  
शब्दात

कसे सांगू.'' (पृ. ८३)

''आदिवासी साहित्याच्या जाणिवांबरोबरच प्रेरणांच्या संदर्भात भुजंग मेश्राम यांची अतिशय स्पष्ट भूमिका आहे. त्यांच्या मते ''डॉ. बाबासाहेब आंबेडरांच्या प्रेरणेने दलित लेखकांनी स्वतःचे पीठ तयार केले. तसेच आदिवासी लेखकांसमोर प्रेरणेचे निमित्त म्हणून दलित लेखक डोळयासमोर होते. आंबेडकरांच्या विचारांतील शक्तीस्थळांमुळे आदिवासी साहित्याला दिशा दिग्दर्शन मिळाल्याने साहित्याची मूलभूत प्रेरणा डॉ. आंबेडकर हेच आहे''४ याची खंत मात्र कवीच्या कवितेत जाणवत राहाते मानवी मनावर, जगावरच अनाहुतपणे घाला घालणाऱ्या 'कोरोना' नावाच्या विषाणूने मानवी जीवन उध्वस्त करून टाकले. भीतीच्या सावटाखाली जगत असताना जीवनाच्या क्षणभंगुरतेचे अनोखे दर्शन 'माणसाची जिद' या कवितेत मांडले आहे. जगाचा विनाश करणारे शस्त्र का थांबवू शकत नाही ? या जगाचा, स्वतःचा विनाश ? असा सवाल ते विचारतात. भविष्यवाणी सांगणारे भविष्यकारांना जगाच्या या सावटाची का केली नाही भविष्यवाणी ?

आपले जग ! केवळ थांबलेच नाही तर ते मुकेही झाले आहे.
आपल्या तोंडावरचे मास्क
त्या मुकेपणाचे प्रतिक होय. वैज्ञानिक संशोधक,
विद्वान भविष्यकार कसे सगळेच मुखस्तंभ झालेत
अन् बसलेत दडून आपल्या भयाच्या भुयाऱ्यात. (पृ. ८६)

कवी भाकीतांवर विश्वास न ठेवता विज्ञान जगाचा पुरस्कार करणारे आहे. कोरोना संकटाची भाकीते किंवा भविष्यवाणी कोणी केली नाही? जो तो जीव मुठीत धरून दबा धरून बसत होते. माणसापासून आधीच दूर दूर गेलेला माणूस अजून जास्त दूर जावू लागला.

विशिष्ट व्यवस्था समाजातील काही घटकांवर आणि घटनांवर कशी पोसली जाते याचे मार्मिक चित्रण करताना कवीची लेखणी कुठेही घाबरत नाही हे कवी आणि कवितेचे सगळयात मोठे यश आहे.

'साचेबध्द क्रांतिकारक' या कवितेत कवी म्हणतात,

काय विचित्र हे लोक !
अजून जुन्या चौकटी तोडून बाहेर
यायला तयार नाहीत,
अन् मी पडलो असा व्यवस्थाभंजक
चौकटीची तोडफोड करणारा''. (पृ. ४४)

चौकटीची तोडफोड करणाऱ्या माणसावर व्यवस्था कशी घाला घालते याचे चित्रण मॉल्कम, मॉर्टिन, ह्यवेचे लिंकन..... इ. उदाहरणे देऊन या देशाचा रक्तरंजित लढाई बरोबर देशद्रोहीचे कंठस्नानाचे, त्यागाचे चित्रण करतात. मात्र 'दादा' कविता मनाला चटका लावून गेली.

**माधव सरकुंडे यांच्या कवितेचे विशेष :**

१) माधव सरकुंडे यांची कविता अन्याय, अत्याचार सारख्या घटनातून निर्माण झाली आहे.

२) जीवन, जाणिवांच्या अस्वस्थेतून जगण्याच्या तगमगीतून शब्दबध्द होताना दिसते. शब्दबध्द होताना ज्या व्यवस्थेचे, वर्गाचे, समाजाचे, जात, धर्माचे चित्रण करते. समाज परिवर्तनतळमळ, कळकळ त्याच्या शब्द्यातून दिसते, ते वाचकाला अंतर्मुख करते.

३) चिंतनशीलतेतून कविता निर्माण झाल्यामुळे ती वास्तवाचे चित्रण करताना अनेक घटना, प्रसंग, व्यक्ती, विषयाचे वर्णन करते. गंभीरतेतून निर्माण झालेली कवित उपहासात्मक आणि उपरोधीक शैलीत अभिव्यक्त होते,

४) कवी कवितेतून अनेक प्रश्न या व्यवस्थेवर मांडतो. निर्णय घेण्याची जबाबदारी या समाजावर टाकतात. समाजाला जागे करण्याचे काम लेखणी करत आहे, (उदा, तुम्ही काय करणार, तुम्ही ठरवा).

५) त्याची कविता समाज परिवर्तनाबरोबरच व्यक्ती मन आणि विचार परिवर्तन करष्याचा प्रयत्न करत आहे.

६) नाईटींगेल, कोरोना, फारकत माणसाची जिद्द शाळकरी मुलीचे प्रश्न, लाईफलाईन कोरोनाचे समाज मनावरील व्यक्ती मनावरील परिणामाचे चित्रण करते

७) बुदध, ज्योतिबा फुले, डॉ. आंबेडकर, रमाई, माय-बाप, विठ्ठल आदर्शवत आहे.

८) रमाई, बुध्द, सारखी मिथके नव्या कालानुरूप कवितेला आशय प्राप्त करूनदेत आहेत. कालानुरूप समाजात घडणारी स्थित्यंतरे मांडताना कविची कवितेला एका उंचीवर नेऊन ठेवते.

९) कॅमेरा, क्लीक, एक्सपोज, लेन्स, आयडेन्टीटी, रेडीअम स्टेटूस, रेडीअम पिटफॉल, शिया वॉलेट, पर्सनल, प्रमोशन पर्सनल, टाईमलाईन, लाईफलाईन, गँगरीन, मास्क मॅम, कॅनव्हास, कॉल व्हॉट्अप क्लोनिंग, लॉकडाऊन, कोरोना, हिन्दी आणि इंग्रजी शब्दाचा वापर करणारी कविता आशयसंपन्न आहे.

१०) अनेक प्रतिमा आणि प्रतिकांचा वापर कवितेला आशयघनता आणि व्यापकतेने प्राप्त करून दिला आहे. माझ्या तप्त हृदयासाठी गँगरीन सारखे पसरत चाललेला हा लॉकडाऊन, श्वासातला सुगंध ! सूर्याला कॉरंटाईन करून तुम्ही सजवा तुमचे आकाश, काजव्याने उजेडाचा यजमान, पिसाळलेल्या समुद्राशी, गुलाबी शहर दिव्यत्वाचे रंग.

शेवाळ आयुष्य, वृध्द प्रकाश, काळजाचा लीलाव, दुखाच्या लाटा, फसवे स्वर्ग, वेळही लागत कुत्र्यासारखा, गारपिटीने झोडपल्यागत आठवणी, चेहऱ्यावरील भूकंप, गारव्याचे बेट, मुक्या गाईला, पांगळया प्रेमाला, जन्मजात बेघर, व्याकूळ वस्ती, करूणेचे गाव, बेवारस स्वप्न,,,,,,इ

११) सर्वनाम आणि नामाचा वापर, उदा. तुम्ही काय करणार ? कसला जगलो मी ? मी हरलो नाही, तुम्ही ठरवा, कविता काय असते करणारी कविता विधानात्मक गद्यात्मक असलनी तरी ती बऱ्याच ठिकाणी प्रश्नार्थक स्वरूपात अभिव्यक्त होते. मी, तु, तुम्ही, आपण, माझे चा वापर करणारी कविता कोणत्याही प्रकारचा साज ल्यालेली नाही. कोणत्याही प्रकारचा अलंकार नाही वास्तववाकडे डोळसपणे पाहून विचारांची सखोलता, गंभीरता, विविधता, वास्तवता, व्यवस्थेतील

ISSN–2278-5655

AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

*Volume–XI, Issue– IV* *July – August, 2022*

OPEN ACCESS Original Research Article

भीषणता गुलामी मांडताना कवी जो सल्ला देतात तो

मात्र प्रेरणादायी आहे.

जे लढत असतात,

तेच घडत असतात,

बाकीचे जागीच कुढत असतात

किंवा पडत असतात, सडत असतात

आणि संपून जातात. (पृ. २२).

किंवा

तुम्ही ठरवा, ‘‘अंधाराचे शरणार्थी म्हणून जगायचे की उजेडासाठी शहीद व्हायचे ?

**संदर्भ ग्रंथसची :**

१) माझा दम घोटतोय - १ जानेवारी, २०२१ साली देवयानी प्रकाशन, यवतमाळ प्रकाशन पृ. १२

२) आदिवासींची लोकगीत- चौधरी सोपानदेवे हाकारा जुलै - डिसेंबर, १९८३, अंक ४, पृ. १३)

३) mr.m.wikipedia.org

४) आदिवासी साहित्य आणि अस्मिता वेध-प्रमोद मुनघाटे, नागपूर, महाराष्ट्र साधना साप्ताहीक दि. २७ सप्टेंबर, २०१४).

*Cite This Article:*

**प्रा. डॉ. कल्याणी शेजवळ, *(2022).*** जगवणारी आणि जागवणारी माधव सरकुंडे यांची कविता, ***Aarhat Multidisciplinary International Education Research Journal, XI (IV) July – August, 91-98.***